सातारा, शुक्रवार, २२ सप्टेंबर २०१७ । किंमत ₹ ४

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव




गोमटू (भूतान) : बॅडमिंटन स्पर्धेतील सुवर्णपदक स्वीकारताना गणेश सपकाळ.

# आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये गणेश सपकाळला सुवर्णपदक

## भूतानमध्ये झालेल्या बॅडमिंटन स्पर्धेत कामगिरी

**कोरेगाव, ता. २१ :** येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील गणेश सपकाळ या विद्यार्थ्याने भूतानमधील गोमटू येथे झालेल्या चौथ्या इंडो-भूतान युवक ग्रामीण आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत बॅडमिंटनच्या एकेरी व दुहेरी या दोन्ही प्रकारांत सुवर्णपदक पटकावले आहे.

या स्पर्धेत पहिल्या फेरीत अपयश आले असतानाही त्याने दुसऱ्या व तिसऱ्या सेटमध्ये बाजी मारली. यापूर्वी गणेशने दोन वेळा राष्ट्रीय स्तरावरील खेळासाठी सहभाग नोंदविला होता. पश्चिम भारत आंतरविद्यापीठ स्पर्धेत त्याने रौप्यपदक मिळवले होते. पाटणसारख्या ग्रामीण भागात जडणघडण झालेल्या गणेशने जिद्द, चिकाटी व परिश्रमाच्या बळावर यश संपादन केले आहे. त्यास क्रीडा शिक्षक प्रा. बाळकृष्ण भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी त्याचे अभिनंदन केले.